**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 2, FEB - 2022 Publication Date: 28/02/2022

DOIs:10.2018/SS/202202009 --:-- Research Article

# भारतीय राज्यघटनेच्या विकासाची ऐतिहासिक पृष्ठभूमी

**प्रा. शशिकांत ज. चवरे**
सहायक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)
न.मा.द.महाविद्यालय,गोंदिया(मरा)
Email - shashikantchaure14@gmail.com

**सारांश :** प्लासी व बक्सारमधील ईस्ट इंडिया कंपनीच्या विजयाने ब्रिटिशांची राजकीय सत्ता भारतात भक्कम पायावर रोवली गेली. ईस्ट इंडिया कंपनीतील अधिकारी आणी कर्मचारी हे प्रामुख्याने वाणिज्य क्षेत्राशी संबंधित होते प्रशासनाचा त्यांना अनुभव नव्हता त्यामुळे प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेत **मोहम्मद घोरी व मोहम्मद गझनीच्या लुटीपेक्षा शेकडो पटींनी** लुट ईस्ट इंडिया कंपनीने केले. **इंग्लडला लोकशाहीची जननी गणल्या जाते.** त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील अमानुष कारभाराची निंदा भारताप्रमाणे इंग्लडमध्येही होवू लागली. तांत्रिक साधनाच्या अभावामुळे ब्रिटिश पार्लमेन्टचा कंपनी सरकारवर वचक फारसा नव्हता. अचानक केलेल्या कर्जाच्या मागणीमुळे कंपनी सरकार **ब्रिटिश पार्लमेन्टच्या** तावडीत सापडली. त्यातून 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्ट चा जन्म झाला. याला **भारतातील पहिली लिखित लघु राज्यघटना** असे म्हणने अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

येणा-या प्रत्येक चार्टर ॲक्ट नंतर कंपनी सरकारची सत्ता ब्रिटिश पार्लमेन्टने **क्षीण केली.** 1773 ते 1858 या दरम्यान प्रशासन चालवण्याकरीता ज्या **घटकात्मक दुरूस्ती** करण्यात आल्या त्या भारतीयाकरिता नवीन होत्या.

1858 **च्या राणीच्या जाहीरनाम्याद्वारे** ब्रिटिश पार्लमेन्टने भारतीयाकरीता भविष्यात अधिक उदार धोरण अवलंबविण्याची शाश्वती दिली. 1861, 1892, 1909, 1919 व 1935 च्या भारत सुधारणा कादयाद्वारे भारतात अनेक **संस्थागत सुधारणा** करण्यात आल्या शासन कारभार चालवित असतांना जनतेची प्रतीक्रिया जाणून घेण्यासाठी ब्रिटिशांनी विविध कमिशन समित्या नेमल्या व भारतीयांना विविध मंच उपलब्ध करून दिले. **लोकशाहीच्या बुरख्याखाली** ब्रिटिशांनी भारतीयांवर एकाधिकारशाही पध्दतशीरपणे गाजवली व ब्रिटिश सरकार वरदान आहे असे समर्थन करणारा वर्गनिर्माण केला. शासन व प्रशासन चाविण्याच्या नादातब्रिटिशांनी भारतीयांना आधुनीक लोकशाहीची सवय व परिचय करून दिला. त्यांनीनिर्माण केलेल्या **संस्थागत संरचना** लोकतांत्रिक स्वरूपाच्या होत्या परंतु त्यांनाब्रिटिशांनी केंद्रिकृत पध्दतीने राबविले. ब्रिटिश भारतातून गेले पण त्यांनी सोडलेल्या प्रशासकीय यंत्रणेला भारत सोडू शकला नाही व त्याची छाप भारतीय राज्यघटनेवर पडली. हे निर्विवाद सत्य आहे.

**संशोधन विषयातील बीजभाषक शब्द :-** मोहम्मद घोरी व मोहम्मद गझनी, लोकशाहीची जननी, ब्रिटिश पार्लमेन्ट, लखित लघु राज्यघटना, क्षीण, घटनात्मक दुरूस्ती, राणीच्या जाहीरनामा, संस्थागत सुधारणा, लोकशाहीच्या बुरखा, संस्थागत सहरचन.

- **संशोधन विषयाचा उददेश :-**

प्रस्तुत संशोधन विषयाचा उददेश पुढीलप्रमाणे नमूद करता येईल

1. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे हे सिध्द करणे.
2. आधुनिक लोकशाहीचे धडे ब्रिटिश काळात मिळाले याचा शोध घेणे.
3. ऐतिहासिक वारस्याचा प्रभाव राज्यघटना निर्मितीवर होतो, हे सिध्द करणे.
4. भारतातील संसदीय शासन प्रणालीचा ऐतिहासिक पृष्ठभूमीचा उलगडा करणे.

- **संशोधन विषयाचे गृहितकृत्य :-**

प्रस्तुत संशोधन विषयाला दिशा देण्यासाठी पुढील गृहितकृत्याचा स्विकार करण्यात आला.

1. ब्रिटिशांनी भारतात केंद्रीकृत पध्दतीने शासन केले.
2. जनप्रबोधनामुळे प्रतिनिध्यात्मक शासनप्रणालीचा उगम झाला.
3. 1858 नंतरच्या कालखंडात ब्रिटिशाच्या शासन करण्याच्या पध्दतीत बदल झाला नाही.
4. भारताच्या राज्यघटनेवर ब्रिटिश कारकीर्दीचा कोणताही प्रभाव पडला नाही.

- **संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्याकरिता प्राथमिक स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला त्यात ग्रंथरचना, ऐतिहासिक दस्ताऐवज वर्तमानपत्र, संकेतस्थळ इत्यादीचा उपयोग करून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीने संशोधन करण्यात आला.

- **संशोधन विषयाचे महत्व :-**

प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्व पुढीलप्रमाणे व्यक्त करता येईल.

1. आधुनिक लोकशाहीचा विकास ब्रिटिश कालखंडात झाला याची कल्पना येण्यास मदत होते.
2. वर्तमान काळातील राजकीय व्यवस्थेवर ब्रिटिश कारकीर्दीचा प्रभाव आहे हे समजण्यास मदत होते.
3. प्रतिनिधिक शासन प्रणालीचा विकास ब्रिटिशांमुळे भारतात झाला. याची प्रचिती होण्यास मदत होते.
4. राज्यघटनेवर ऐतिहासिक वारस्याचा प्रभाव असतो याची साक्ष मिळण्यास मदत होते.

**1. प्रस्तावना :-**

कोणत्याही राज्याच्या विकासाचा आधारस्तंभ तेथील नागरिकांना मिळालेल्या अधिकारांच्या दर्जावर अवलंबून असतो. जे राज्य नारिकांना त्यांच्या न्याय अधिकारांपासून वंचित ठेवतात. त्या राज्याचा पाया वाळूवर आधारलेला असतो. अधिकार हे नागरिकांच्या सुप्त व व्यक्त गुणांच्या विकासाकरिता पोषक परिस्थिती असते. जेवढया जास्त प्रमाणात राज्य व समाज नारिकांच्या सर्वांगीण विकासाकरिता पोषक वातावरणाची निर्मिती करते त्या प्रमाणात नागरिकांचा व एकंदरीत देशाचा विकास होतो.

स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांच्या मूलभूत आधारावर देशाच्या विकासाचा पाया अवलंबून असतो. भारतासारख्या देशामध्ये प्राचीन, मध्ययुगीन, मोघल व ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वारस्याचे अध्ययन केल्यास लोकशाही मूल्यांची स्थिती फारशी प्रसंशनीय नव्हती याचे पुरावे मिळतात. राष्ट्रीय एकात्मतेचा भाव व सामाजिक विषमतेमुळे विदेशी शासकांनी भारतावर शेकडो वर्षे राज्य केले. मोघल शासन सत्तेच्या वर्चस्वाखाली भारतातील बहुतांश नागरिक त्याआधी असलेल्या शासन सत्तेप्रमाणे अधिकारांपासून वंचित राहीले. ब्रिटिशांनी भारतातील तत्कालीन परिस्थितिचा फायदा घेवून राजकीय सत्ता रोवली व त्याचा तीव्र गतीने विस्तार केला.

विखुरलेल्या प्रशासकीय व्यवस्थेलाब्रिटिशांनी एकतेच्या सूत्रात बांधण्याचे अभिनव कार्ये केले. संपादित केलेली राजकीय सत्ता दीर्घ काळापर्यंत टिकवण्याकरीता अनेक अभिनव प्रशासकीय सुधारणा ब्रटिशांनी येथे घडवून आणले आहे. मिळवलेली राजकीय सत्ता गाजवीण्याच्या नादात ब्रिटिशांनी भारतीयांना आधुनिक लोकशाहीचे धडे गिरवले. 26 जानेवारी 1950 ला जी राज्यघटना लागू करण्यात आली त्या राज्यघटनेत अर्तभूत असलेल्या विविध घटकांवर ब्रिटिशांच्या प्रशासकीय सहरचनेची छाप पडलयाचे दिसून येते. स्थळ, काळ परिस्थितीनुसार मानवाच्या मागण्यांमध्ये व दृष्टीकोनात परिवर्तन होत असते. त्याची छटा तत्कालीन राज्यघटनारूपी दस्तऐवजावर उमटते. ज्या राज्यघटनेने भारतीयांना सामाजिक, राजकीय, आर्थिक न्याय मिळवूनदिला त्या राज्यघटनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा पाया ब्रिटिशांनी रचला असे म्हणणे येथे अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. राज्यघटना ही इतिहासाचे प्रतिकाळ असते. राज्यघटनेकडून नारिकांच्या फार मोठया अपेक्षा असतात. नारिकांच्या न्याय भावभावनांचे प्रतिबींब राज्यघटनेत उमटले असते. भारताच्या राज्यघटनेवर ब्रिटिशांच्या कारकीर्दीच्या प्रामुख्याने कसा प्रभाव पडला याचा मागोवा घेण्यासाठी व पुरावे शोधण्याकरिता प्रस्तुत संधोधन विषयाची निवड संशोधनाकरिता करण्यात आलेली आहे. त्याबाबत टप्प्या-टप्प्याने विचार मुद्देसुदपणे पुढीलप्रमाणे व्यक्त करण्यात येत आहे.

**2. घटनात्मक विकास व भारत :-**

विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. भारतीय राज्यघटनेचाविकासाचा पाया प्राचीन, मध्ययुगीन, मोगलकालीन, ब्रिटिशकालीन राजकीय व्यवस्थेमध्ये तत्कालीन प्रशासकीय सहरचनेच्या आधारेनिर्माण झाला. भारतीय राजकीय व्यवस्थेचा प्रवास राजतंत्रांकडून आधुनिक तंत्राकडे झालेला आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात साम्राज्य विस्ताराची संकल्पना अस्तित्वात होती. तत्कालीन काळात पोलिसी राज्याचे अस्तित्व होते. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचे पुरावे तुरळक प्रमाणात आढळून येतात.

प्रमुख राजकीय पद प्राचीन व मध्ययुगीन काळामध्ये अनुवांशिक स्वरूपाचे होते. त्यामुळे तत्कालीन संवैधानिक सहरचनेबाबतीत निर्णयनिर्धारण प्रक्रिया केंद्रित स्वरूपाची होती. “वेद, पुराण, उपनिषद व ऋग्वेद”[1] यामध्ये राजावर लोकमताचे दडपण होते. याचे पुरावे मिळतात. विदेशी शसकांनी भारतामध्ये शासन करीत असतांना येथील प्राचीन व मध्ययुगीन वारसाच्या मूलभूत सापडयाला धक्का न लावता भारतावर दीर्घकाळपर्यंत शासन केले. आधुनिक काळातील गणतंत्राप्रमाणे “बौध्दकालीन गणतंत्राचे”[2] अस्तित्व भारतात होते परंतु तत्कालीन काळातदेखील राजा अनुवांशिकच होता. त्याच्या कार्याला मदत करण्याकरिता गणतंत्रात्मक पध्दातीने गठित झालेली “समिती” इतिहासात अस्तित्वात होती.

कपंनीपासून क्राउनकडे सत्ता हस्तांतरणादरम्यान ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांवर शासन प्रस्थापित करण्याकरिता भीषण अन्याय व अत्याचार केले. परंतु त्याचबरोबर सत्तेला अधिमान्यता प्राप्त करून घेण्यासाठी घटनात्मक पाया रचून भारतात अनेक प्रकारच्या राजकीय सामाजिक आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. भारतीयांचा असंतोष शमवण्याकरिता बनावटी सुधारणांचे आमिष ख्विले असे जरी असले तरी 1773 ते 1858 दरम्यानचा काळ राजकीय विकासाचा आरंभाचा काळ होता असे म्हणणे येथे

अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. “एफ. डब्लु.रिग्जरच्या”[3] मतानुसार शासनावर नियंत्रण प्रस्थापित करतांना लोकतांत्रिक मार्गाने नियंत्रण प्रस्थापित करणे राजकीय विकासात अभिप्रेत असते. त्याचा प्रारंभ 1858 पूर्वी झाल्याचे ऐतिहासिक पुरावे मिळतात.

1857 चा उठाव शमवण्यामध्ये ब्रिटिशांना तारेवरची कसरत करावी लागली. 1857 च्या उठावामुळे ईस्ट इंडियाला कंपनीला भारतातील सत्ता गमवावी लागली. भारतीयातनिर्माण झालेल्या असंतोषांची आग पूर्णपणे विझवण्याकरिता ब्रिटिशांना घाम गाळावा लागला. भारतात अभूतपूर्व अशा सुधारण्याचा क्रम सुरू झाला. 1861, 1892, 1909, 1919, 1935 इत्यादी साली भारतातील आपले साम्राज्य कायमस्वरूपी निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये चढत्या क्रमाने राजकीय सहभागाचे आमिष ब्रिटिशांनी भारतीयांना दिले. त्यातूनच आधुनिक काळातील राज्यघटनेचा पाया रचण्यास मोलाचे सहकार्य लाभले. ब्रिटिशांच्या शासन करण्याच्या कलेमुळे भारतीयांना आधुनिक लोकशाहीचा परिचय झाला. ज्या ब्रिटिशांनी शासन सत्ता दीर्घकाळापर्यंत चाविण्याकरीता घटनात्मक सहरचना आखली त्यामुळे भारतीयांमध्ये भारतीयत्वाची अस्मिता जागृत झाली. प्राचीन काळातील लाभलेल्या राजकीय संस्कृतीला इंग्रजांनी आधुनिक काळात जागृत केले त्यामुळे भारतीयांमध्ये राजकीय परिपक्वतेची वाट तयार होण्यास प्रारंभ झाला.

युग कोणताही असो शासनसत्तेवर जनतेचे नियंत्रण असणे हे लोकशाहीशी अभिप्रेत आहे. राजेशाहीचे प्रस्थ असतांना देखील जनमताच्या कौलाला राजा दुर्लक्ष करू शकत नव्हता. 19 व्या शतकाच्या अंत व 20 व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा जुन्या प्राचीन वारस्याला बदलत्या परिस्थिनुसार नव्या मागण्यांशी जुळवून घेण्याचे काम ब्रिटिश कारकीर्दीत नकळत घडले. यालाच “ल्युसियन पाई”[4] यांनी राजकीय विकास संबोधले आहे. सुमारे 190 वर्षे ब्रिटिशांनी भारतावर राज्य केले असे शासन करतांना 1947 पर्यंत ज्या विविध प्रशासकीय सुधारणा भारतात करण्यात आल्या त्यांचा राज्यघटनेत बदलत्या परिस्थितीनुसार समावेश करण्यात आला. त्याची ऐतिहासिक तथ्ये व वर्तमानकालीन प्रभाव तपासण्याचा प्रयत्न यापुढील चर्चेत करण्याचा प्रयत्न केलेला आहे

**3. कंपनी शासनापासून ते क्राउनकडे हस्तांतरणाचा काळ :-**

शेकडो वर्षे विदेशी सत्तेच्या गुलामीत असलेला भारत सोन्याची खान म्हणून शीर्षकाने गणल्या जात होता. 16 व्या व 17 व्या शतकामध्ये भारताचा व्यापार समृध्दीच्या अतिउच्च शिखरावर पोहचला होता. सर्व विश्वातील सोने भारतात जमा झाले की काय असे वाटत होते. याचा दुजोरा तत्कालीन “फ्रासिसी पर्यटक बर्नियर”[5] यांनी दिलेला आहे.

16 व व 17 व्या शतकामध्ये मोगलाची शासन सत्ता, प्रतिष्ठा व शक्तीच्या अतिउच्च शिखरावर होती त्यामुळे पाश्चात्य देशांची भारताकडे वाकडी नजर करण्याची हिम्मत झाली नाही ‘‘31डिसेंबर 1600 मध्ये तत्कालीन राणी एलिझाबेथ यांनी 15 वर्षा करिता’’[6] दक्षिण आशिया व भारतात व्यापार करण्याकरिता ईस्ट इंडिया कंपनीला परवाना दिला. व्यापारी उददेशाने प्रवेशित झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील सामाजिक व राजकीय दुंभगतेचा फायदा घेवून आपली राजकीय सत्ता रोवल्यास प्रारंभ केला. 1757 ची प्लासीची लढाई व त्यातील ब्रिटिशांचा विजय इंग्रजाकरिता राजकीय सत्ता विस्तारण्याकरिता मैलाचा दगड ठरला. 1765 ते 1784 दरम्यान ईस्ट इंडिया कंपनीने भारतात जो कहर केला त्याचे ऐतिहासिक पुरावे आढळून येतात. ‘‘रिचर्ड बेचर आणि के.एम.वण्णीकर’’[7] या लेखकांनी तत्कालीन ईस्ट इंडिया कंपनीच्या शासन कलेवर घणाघाती कटाक्ष केलेला आहे. सर्वसाधारणपणे 1770 नंतर इंगलंडमध्ये औदयोगिक क्रांतीचा प्रारंभ झाला असे मानले जाते. या औदयोगिक क्रांतीला ईस्ट इंडिया कंपनीने भारतात केलेली अभुतपूर्व लूट सहायक होती. याची कबुली ‘‘ब्रुक ऐडम्स’’[8] यांनी दिलेली आहे. कंपनी सरकारच्या अमाणूष शासनाची वार्ता इंग्लडपर्यंत वारंवार पोहचत होती. परंतु त्यावर लगाम कशी घालायची हा पेच इंग्लंडच्या संसदेला पडला. अखेर 1772 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचेदिवाळेनिघाले व त्यातून 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टचा जन्म झाला. 1773 पासून 1858 पर्यंतचा कालावधी शासन व प्रशासन चालवण्याकरिता ब्रिटिशांनी ज्या राजकीय सामाजिक शैक्षणिक व आर्थिक सुधारणा घडवून आणल्या त्याचा भारताच्या राज्यघटनेवर अतिशय प्रभाव पडला त्याचा संक्षिप्त आढावा येणा-या परिच्छेदामध्ये घेण्यात येईल.

बंगाल, मुंबई व मद्रासमधील दिवाणी अधिकार ईस्ट इंडिया कंपनीला प्राप्त झाल्यामुळे कंपनीने या तीनही प्रातांत कमालीची लूट केली. कपंनी सरकारच्या अमानुषपणे शासन करण्याविषयीची वार्ता इंग्लडंच्या सरकारकडे पोहचत होती. भारतातील कंपनी सरकारने इंग्लडच्या सरकारला 10 लाख पौंड कर्जाची मागणी केली. या सुवर्ण संधीचा फायदा घेत लॉर्ड नॉर्थ यांनी रेग्युलेटिंग ॲक्टचा प्रस्ताव इंगलडच्या पार्लमेन्टसमोर ठेवला. या प्रस्तावाला “हाउस आफ कॉमन्स व हाउस आफ लॉडस ने 10 जून व 19 जून 1773 ला मंजूरी दिली”[9] 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टमुळे भारतात प्रथमत:च लिखित स्वरूपाच्या दस्तऐवजाने शासन कारभार करण्याचा प्रारंभ झाला. “कीथच्या मते”[10] 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टमुळे भारतातील कंपनी सरकारवर इंगलडच्या पार्लमेन्टचे वर्चस्व प्रस्थापित होवून सत्तेची सूत्र क्राउनकडे गेली.

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टमुळे भारतामध्ये विधान मंडळात्मक शासनप्रणाली व न्यायालयीन पुनर्वलोकनाचा आरंभ झाला. 1774 मध्ये कलकत्ता येथे कोर्ट विलियममध्ये “सर्वोच्च न्यायालयाची”[11] स्थापना करण्यात आली. तत्कालीन गव्हर्नर जनरल यांनी घेतलेल्या निर्णयाची नोंदणी सर्वोच्च न्यायालयात होणे अनिवार्य करण्यात आले तसेच गव्हर्नर जनरल व त्याच्या परिषदेनेनिर्णय घेतांना बहुमताच्या कौलाला ॲक्टनुसार महत्व प्राप्त झाले.

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार बंगाल, मुंबई, मद्रास या तीनही प्रेसिडेन्सीचा प्रमुख म्हणून गव्हर्नर जनरल या पदाचीनियुक्ती करण्यात आली. प्रथम गव्हर्नर जनरल “वॉरेन हेस्टिंग”[12] यांनी तत्कालीन कंपनी सरकारमधील अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवांना नौकरशाहीचे रूप प्राप्त करून दिले. व त्यांच्यावर सुरक्षा, शांती व अन्य जबाबदा-या सोपविण्यात आल्या. कंपनी

सरकारमधील अधिकारी, कर्मचारी, गव्हर्नर जनरलच्या परिषदेतील सदस्य सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधिश व अन्य न्यायाधिशाला राजा, नवाब, “नागरिकांकडून भेटवस्तु अथवा नजराणा घेण्यास 1773 च्या ॲक्ट ने मज्जाव”[13] केला. यालाच ‘अनामिकता’ असे संबोधता येईल.

शासन कारभार करण्याच्या कलेमध्ये ब्रिटिश पारंगत होते. निर्माण केलेले नियम कायदे अधिनियम याला जनतेचा प्रतिसाद कसा मिळतोय याचा आढावा घेवूनच ब्रिटिश शासन कारभार चालवण्याविषयीची पुढील चाल खेळत होते. 1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार कंपनी सरकार शासन करत अहे काय य बाबतीतला अहवाल गोळा करण्याकरिता प्रवर समीती (Select Committee) व चे गुप्त समीतीचे (Secret Committee) चे गठन करण्यात आले होते. या समितीने इंग्लडंमधील ब्रिटिश सरकारकडे भारतातील कंपनी सरकारचे अनेक ग-हाणे प्रस्तुत केले. कंपनी सरकारच्या अत्याचारी शासकाला नियंत्रित करण्याकरिता 1784 मध्ये प्रधानमंत्री पिटस यांनी मोठया चतुराईने कंपनी सरकारच्या शासन संचालकासंबंधी अधिनियम पारित करवून घेतला. त्यामुळे भारतात दुहेरी शासनाची निर्मिती होवून ब्रिटिश सरकारने नियंत्रक मंडळाच्याद्वारे कंपनी सरकारची लगाम आपल्या हाथी घेतली. “1784 या पिटस इंडिया ॲक्ट”[14] मधील तरतुदीमध्ये काही त्रुटी असून देखील या ॲक्टनुसार 1858 पर्यंत कंपनी सरकारने शासन केला. याचे ऐतिहासिक दाखले इतिहासकार “इलबर्ड”[15] यांनी दिले आहे. “1781”[16] च्या न्यायाधिकरण अधीनियमामुळे भारतातीलहिंदु व मुस्लीम यांच्या रितीरिवाज व परंपरागत कायदे यांना अनुसरून न्यायनिवाडा देण्याची तरतूद करण्यात आली.

18 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात कंपनी सरकारच्या भारतातील शासनावर ब्रिटिश पार्लमेन्टने आपल्या वर्चस्वाचा सापडा रचण्यास प्रारंभ केला. ब्रिटिश पार्लमेन्टचा शिरकाव चार्टर ॲक्ट च्या माध्यमातून उत्तरोत्तर वाढत गेला. भारतासारख्याविशाल प्रदेशाची सत्ता एखादया कंपनीकडे दयावी या बाबतीत भारतात व इंग्लडमध्ये सकारात्मक मानसिकतेचा अभाव होता. त्याचाच परिणाम चार्टर ॲक्ट होता. या ॲक्टनुसार भारतातील कंपनी सरकारचा शासन कारभार कसा चालतोय याचा तपास करून दर 20 वर्षाला कंपनी सरकारच्या भारतावरील शासन कारभाराला हिरवी झेंडी देण्याची प्रक्रिया चार्टर ॲक्ट होती.

1773 च्या पहिल्या चार्टर ॲक्टनुसार “गव्हर्नर जनरलच्या शासन सत्तेत”[17] प्रभावशाली वाढ करण्यात आली. केंद्रिय प्रवृत्तीच्या शासनसत्तेला या ॲक्टनुसार प्रारंभ झाला. नियंत्रक मंडळाचे वर्चस्व भारताच्या शासन कारभारावर वाढत गेले. 1813 च्या चार्टर ॲक्टने कंपनी सरकारच्या व्यापार करण्याच्या अधिकारावर कमालीची मर्यादा आणि त्यांची व्यापाराची मर्यादा “चहाच्या व्यापारांशी”[18] निगडित ठेवली. पाश्चात संस्कृतीच्या प्रभावामुळे तत्कालीन मूठभर भारतीयांमध्ये जन प्रबोधकाला प्रारंभ झाला. शिक्षणाच्या अधिकाराविषयी जनजागृतीला वेग आला. मूठभर भारतीयांमध्ये सरकार दरबारी आपले मत मांडण्याचे धाडस निर्माण झाले. याचा परिणाम “पुनरूथाक, वैज्ञानिक प्रगती, शिक्षणाची सोय, साहित्याचा विकास विद्वानांना प्रोत्साहित करण्याकरिता 1813 च्या ॲक्टनुसार 1 लाख रूपयांची राखीव तरतूद करण्यात आली.”[19]

तत्कालीन भारत राजे रजवाडे आणी संस्थानिकाच्या शासन कारभारात विभाजित होता. तत्कालीन कायदे राजेरजवाडे व संस्थानिक निहाय अतित्वात होते. त्यामुळे त्यात एकसूत्रतेचा अभाव होता. “विधी आयोगाने”[20] या बाबतीत सरकारला जाणीव करून दिली. “लॉर्ड मॅकाले”[21] यांनी प्राज्य पाश्चात्य व तत्कालीन अस्तित्वात असलेल्या कायदयाचे संहिताकरण करून भारतीय दंड संहितेची निर्मिती केली. परिस्थिती अन्वये तत्कालीन भारतीय दंड संहितेतील अनुच्छेद काही अंशी बदल करून जशाच्या तसे वर्तमान स्थितीत लागू आहेत. 1833 च्या चार्टर ॲक्टमुळे तत्कालीन भारतीय नागरीकांना जे लाभ मिळाले ते त्या आधीच्या विदेशी शासकांनी व भारतीय सत्ताधारकांनी कधीही दिले नसतील यामुळे “लॉर्ड मेकट मोर्ले”[22] यांनी 1833 ॲक्टला भरतातील मानवी मूल्याची बीजे पेरणारा ॲक्ट असे संबोधले आहे. त्याच्या कथांना ऐतिहासिक तथ्याचे चिकित्सक अध्यन केल्यास सत्यांश आढळतो.

1853 च्या ॲक्टनुसार कंपनी सरकारच्या अंताला प्रारंभ झाला. त्यानंतर कंपनी सरकारचे अस्तित्व ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या धोरणावर अवलंबून होते. कंपनी सरकारच्या हातातून सत्ता काढावी अशी मागणी भारतात व इंग्लडंमध्ये प्रखरतेने करण्यात आली. 1853 च्या ॲक्टनुसार प्रतीनिधिक शासनाला साजेशी “लघु संसदेचा”[23] उगम झाला. कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्या स्वतंत्र बैठका होण्यास प्रारंभ झाला.

1773 च्या रेग्युलेटिंग ॲक्ट व त्यानंतर पारित करण्यात आलेले चार्टर ॲक्ट याद्वारे ब्रिटिश सरकारची सत्ता प्रत्येक दशकानंतर वाढत गेले. व भारतातील कंपनी सरकारची सत्ता मावळत गेली. 1857 च्या भारतीय सैनिकांच्या विद्रोहाने कंपनी सरकारच्या अन्याय व अत्याचाराचे पितळ उघडे केले. तत्कालीन सरकारने भारतातील स्वातंत्र लढयाचा या विद्रोहाला अथक परिश्रमाने शमविले. भारत व इंग्लडमध्ये अनेक दशकापासून कंपनीसरकारच्या बरखास्तीची मागणी होती. त्याची पूर्तता “1858 च्या भारत प्रशासन सुधारणा अधिनियम द्वारा झाली.”[24] भारताची शासन सत्ता कंपनीकडून क्राउनकडे हस्तांतरित झाली.

**4. क्राउन कडून भारतीयांनकडे सत्ता हस्तातरणाचा काळ :-**

1857 च्या विद्रोहातून ब्रिटिशांनी धडा गिरवला की, भारतातील शासन सत्ता प्रदीर्घकाळापर्यंत कायम ठेवायची असेल तर भारतीयांना प्रशासनाशी जोडणे अगत्याचे आहे. कंपनी सरकारकडून क्राउनकडे सत्ता हस्तांतरणाची औपचारिक प्रक्रिया 1958 च्या भारत प्रशासन सुधारणा अधिनियमाद्वारे पार पाडण्यात आली. 1 नोव्हेंबर 1858 मध्ये राणीचा जाहिरनाम्यात भारतीयांना भुरळ पाडणा-या अनेक उदारमतवादी घोषणा करण्यात आल्या. कंपनी सरकारच्या बाबतीतली नकरात्मक मानसिकता इंग्लड व भारतामध्ये फार पूर्वीपासून होती. रॅमेस्ययुरने”[25] कंपनी सरकारला पाचवे चाक संबोधले होते. परंतु सत्ता हस्तांतरणानंतरही शासन

Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 2, FEB - 2022 Publication Date: 28/02/2022

करण्याच्या कलेत फारसा बदल झाला नाही. राणीच्या घोषणापत्रात अनेक उदारमतवादी घोषणांचा समावेश असून देखील भारतीयांना प्रशासनातील मुख्य पदांवर नियुक्त करण्याचे प्रमाण अत्यल्प होते. उदा. "1947 पर्यंत सैनिक विभागातील ब्रिगेडियर पदाच्या वर एकाही मूळ भारतीय व्यक्तीची नेमणूक करण्यात आली नाही."[26] आधुनिक लोकशाहीला समस्त अशा घटनात्मक पायाची रचना 1773 ते 1858 पर्यंतच्या ब्रिटिशांच्या शासनप्रणालीद्वारे रचण्यात आला. या पायावर बनावटी स्वरूपाची परंतु मजबूत आधारावर आधुनिक लोकशाहीची इमारत क्राउनच्या कारकर्दीत उभारण्यात आली. आधुनीक लोकशाहीचा परिचय भारतीयांना या कालखंडात झाला. 1857 च्या विद्रोहातून धडा घेत जेव्हा जेव्हा भारतीयांचा असंतोष पेटत होता तेव्हा तेव्हा ब्रिटिश सरकार राजकीय व सामाजिक सुधारणारूपी पाणी शिंपून असंतोषाची आग विझवण्याचा प्रयत्न करीत होते. "प्रधानमंत्री लॉर्ड डरबीच्या"[27] धोरणानुसार क्राउनने भारतीयांच्या हातात अतिशय मंद गतीने सत्ता देण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ केला. परंतु केंद्रिकृत शासनाची सुत्रे क्राउनने 1773 च्या रेग्युलेटिंग अक्टप्रमाणे आपल्याकडेच ठेवली. तत्कालीन बम्बईचे गव्हर्नर "बार्टल फ्रेयरच्या'[28] मतानुसार भारतीय लोकांची नाडी तपासण्याकरिता विशिष्ट कालावधीच्या अंतराने बौध्दिक चातुर्याचा आधार घेवून वायुमापक व सुरक्षा भिंतीप्रमाणे राजकीय व सामाजिक सुधारणेची पर्वणी भारतीयांना ब्रिटिश क्राउने दिली. त्याचा थोडक्यात आढावा येणा-या पुढील परिच्छेदात घेण्यात येईल.

1858 पूर्वी ब्रिटिश पार्लमेन्ट भारताच्या प्रशासन कारभारावर करडी नजर ठेवून होती. तत्कालीन काळामध्ये दळणवळण साधनांचा अभाव व कंपनी सरकारच्या प्रशासनाविषयी माहिती मिळण्यास बराच कालावधी लागायचा त्यामुळे ब्रिटिश सरकार कंपनी सरकारच्या कारभाराविषयी अधिक लक्ष पुरवित होते. 1850 च्या मधल्या दशकात तारा यंत्राच्या संशोधनामुळे इंग्लडमधीलब्रिटिश सरकारने भारतातील प्रशासनावर आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणावर लक्ष देण्यास बंद केले कारण आवश्यक ती माहिती त्यांना लगेच प्राप्त होत होती. "राज्य सचिव व त्याच्या अंतर्गत 15"[29] सदस्याद्वारे क्राउनच्या अधिन राहून भारतीय प्रशासन सुगमपणे चालले होते. "1861 च्या ॲक्ट नुसार पोलीस आणि सेना यांचे पृथकरण करण्यात आले."[30] व्हॉहसरॉय वा गव्हर्नर जनरल यांच्या अधिकार क्षेत्रात वाढ करण्यात आली. विशेष परिस्थितीमध्ये अध्यादेश काढण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला. या अस्त्राचा उपयोग गव्हर्नर जनरलने अतीशय धुर्तपणे प्रशासनाला चालवण्यासाठी केला.

1858 नंतर US कॅनिंगच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात्मक कॅबिनेट प्रारंभ झाला. गव्हर्नर जनरलच्या परिषदेतील सदस्यांना विशिष्ट विभाग वाटून देण्यात आले. कायदा निर्माण करण्याकरिता विधान परिषदेचे गठन केले गेले. गव्हर्नर जनरलच्या सहपरिषदेमध्ये "भारतीयांना"[31] मनोनित करण्यात आले असे मनोनित सदस्य नामांकित उच्च वर्णीय होते. मनोनित सदस्य असल्यामुळे ते शासनाच्याविरूध्द जाण्याचा धाडस करत नव्हते. "1861 च्या ॲक्टनुसार प्रांतीय विधान परिषदेला देखील कायदा निर्मितीचा अधिकार अशंत: देण्यात आला"[32] त्यामुळे 1861 चा ॲक्ट सत्ता विकेंद्रीकरणाचा आभास करवतो.

योग्यता व पात्रातेच्या आधारावर नौकरशाहीमध्ये भर्ती होणे ही ब्रिटिश सरकारची गरज होती. त्यामुळे त्यांनी खुल्या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून नौकरशाहीतील पदाधीकारांना नियुक्ती करण्याचा प्रारंभ केला. याच श्रृखंलेत "1886-87 च्या एचीसन आयोगाने तत्कालीन कॉवनेण्टेड व अनकॉवनेण्टेड नागरी सेवा व्यवथा समाप्त केली. व त्याऐवजी खालील सेवांचा प्रारंभ केला.

1. इंम्परीयल सिविल सर्विस – या नागरी सेवेमध्ये इंग्लडमधून भर्ती होत होती.
2. प्रोविन्सियल सिविल सर्विस – या नागरी सेवेमध्ये समाविष्ट पदाधिका-यांची भर्ती भारतातून केली जात होती.
3. सब ओडिनेट सिविल सर्विस – या नागरी सेवेमध्ये समाविष्ट असलेल्या पदाधिका-यांची भर्ती देखील भारतातूनच होत होती."[33]

जन सम्मती जन इच्छा व जन समर्थन शिवाय शासन सत्ता चालविणे अवघड आहे याची पूर्ण कल्पना ब्रिटिशांना होती. पारित केलेले नियम अधिनियम व कायदे यांची अमलबजावणी झाल्यानंतर जनतेची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी ब्रिटिशांनी विविध हेर नेमले होते. भारतीयांच्या ब्रिटिश सरकार संबंधीच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी "ए. हयू. हूम. यांच्या प्रोत्साहानाने 1885 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची स्थापना करण्यात आली."[34] तत्कालीन कॉग्रेसचा मंच 1861 वर्षी पारित केलेल्या अधिनियमांच्या निकालाबाबतीत फारशी समाधानी नव्हती त्यामुळे तत्कालीन कॉग्रेसने ब्रिटिश सरकारसमोर घटनात्मक सुधारणची मागणी रेटून धरली. विधानपरिषदेचा विस्तार करून जास्तीत जास्त भारतीयांना समाविष्ट करून घेण्याची त्यांची मुख्य मागणी होती. याचाच परिणाम 1892 च्या सुधारणा कायदयात झाला. या सुधार अधिनियमाने "केंद्रिय व प्रांतिय विधानपरिषदेतील सदस्यांच्या संख्येत विस्तार केला."[35] सरकारी गैरसरकारी व निर्वाचित सदस्य मिळून विधानपरिषदेचे गठन करण्याचे अधिनियमांनी ठरविले. "तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डफारीन"[36] यांचे भारतीयांच्या स्वशासनातील सहभागीत्वाला पूर्ण समर्थन होते. इंग्लडच्या प्रभुसत्तेला धक्का पोहोचणार नाही याची दक्षता घेत भारतीयांचा अल्प प्रमाणात विधानपरिषदेत समावेश करण्यात आला. 1892 च्या अधिनियमांचे चिकित्सक अध्ययन केल्यास नेहमीप्रमाणे शासनाची मुख्य सुत्र गव्हर्नर जनरलकडे केंद्रित होती परंतु या अधिनियमांमुळे "अप्रत्यक्ष सदस्यांची निवड कार्यकारी परिषदेला प्रश्न विचारणे आर्थिक बाबतीत प्रश्न विचारणे व वादविवाद घडवून आणणे"[37] इत्यादी प्रतिनिधिक शासनाच्या वैशिष्ट्याला साजेसा बाबींना प्रथमत: प्रारंभ झाला.

वर्तमानपत्र व शिक्षणाच्या प्रभावामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादी भावना व राजकीय चेतना तीव्रतेने वाढत होती. पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे लोकशाही मूल्यांची जनजागृती भारतीय अभीजनवादयांनी केली. त्याचाच परीणाम 1892 मध्ये ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा बाबतीतील असंतुष्टित झाला. भारतातून विदेशात गेलेल्या भारतीयांना तुच्छतेच्या नजरेने बघितल्या जात होते. विशेषत: दक्षिण "आफ्रिकेतील भारतीयांना"[38] दासत्वाच्या दृष्टिकोनातून बघून हीन वागणूक दिली जात होती. त्यात "लॉर्ड कर्झन"[39]

Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 2, FEB - 2022 Publication Date: 28/02/2022

सारख्या साम्राज्य विस्तारवादी महत्वकांक्षी व्हर्नर जनरलच्या कृतींनी आगीत तेल ओतण्याचे कार्य केले. ब्रिटिशांविरूध्दचा वाढत चाललेला भारतीयातील असंतोष शमविण्याकरिता तब्बल 17 वर्षानंतर मॉर्ले मिंन्टो सुधारणा कायदयाचे आमीष भारतीयांना देण्यात आले.

1909 च्या मॉर्ले मिंन्टो सुधारणा कायदयाने "केंद्रिय व प्रांतीय विधानपरिषदेच्या कार्यात वाढ केली. निर्वाचनाच्या माध्यमातून निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अर्हता निर्धारित करण्यात आली. केंद्रीय व प्रांतीय कार्यकारिणीमध्ये सदस्यांच्या संख्येत वाढ करण्यात आली.''[40] अशा सुधारणांमुळे लोकशाहीच्या गुणात्मक विकासाला खतपाणी मिळाले परंतु 1909 च्या ॲक्टने भारतातील सांप्रदायीक सदभाव बिघडवण्यास जातीय व धार्मीक पृथकता वाढविण्यात अभूतपूर्व यश संपादन केले. 1909 च्या मॉर्ले मिंन्टो अधिनियमाने मुस्लिमांना पृथक धर्मिक आधारावर संख्येच्या तुलनेत जास्त प्रतिनिधित्व देवून भारतीयांमध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रवादाला कायमस्वरूपी भेग पाडली. यामुळेच के.एम. मुन्शी यांनी मॉर्ले मिंन्टो सुधरणा कायदा म्हणजे "उगवत्या लोकतांत्रिक प्रवासाची हत्या करणारा कायदा अशी उपमा देणे गैर नाही.''[41]

1914 ते 1918 दरम्यान प्रथम महायुध्द झाले. या युध्दामध्ये इंग्लडने प्रमुख भूमिका वठविली. इंग्लडला युध्दामध्ये टिकण्याकरिता व जिंकण्याकरिता गुलाम राष्ट्रातील गत काळात केलेल्या मागण्याकडे लक्ष पुरवावे लागले. भारत देखील याकरिता अपवाद नव्हता. विसाव्या शतकाच्या दुस-या दशकात गोखले योजना लोकमान्य टिळक व बेन्सर यांची होमरूल चळवळ व कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यातील लखनौ योजना''[42] यांनी तत्कालीन निर्माण झालेल्या राजकीय पेचप्रसंगाचा लाभ घेवून आपल्या रास्त मागण्या ब्रिटिशांसमोर प्रस्तुत केल्या. इतर गुलाम राष्ट्रातील देशांना स्वशासनाचा जो अधिकार ब्रिटिशांनी बहाल केला होता. अगदी तशाच स्वरूपाच्या स्वशासनाच्या अधिकाराची मागणी तत्कालीन भारतीय पुढा-यांनी लावून धरली. त्यामध्ये केंद्र व प्रांतीय कार्यकारीमंडळ व कायदेमंडळामध्ये निर्वाचित सदस्यांचे प्रमाण वाढवून त्यांचे बहुमत प्रस्तापित व्हावे ही मुख्य मागणी होती.

मॉर्ले मिंन्टो भारत शासन अधिनियमांवर तब्बल 10 वर्षांनी भारतीयांचा असंतोष दाबण्यासाठी ब्रिटिशांनी भारतीयांसमोर मॉटेंग्यू चेम्सफोर्ड भारत शासन सुधारणा कायदा 1919 आणला या कायदयाने घटनात्मक विकासाच्या प्रक्रियेमध्ये मोलाची भर टाकली. उदा. "1. केंद्रिय कार्यकारिणी परिषदेत 3 भारतीयांचा समावेश 2. केंद्रिय विधिमंडळ व्दिगृही करण्यात आले. त्यातील राज्य परिषद (Council of State) हे उच्च सदन व केंद्रिय विधान सभा (Central Legislative Assembly) हे निम्न सदन म्हणून निश्चित करण्यात आले. 3. मतदारांच्या अर्हता आर्थिक घटकांवर निर्धारित करण्यात आल्या. 4. केंद्रिय विधिमंडळातील सदस्यांना स्थगन प्रस्ताव, पूरक व अल्प प्रश्न विचारणे, अंदाजपत्रकावर वादविवाद करणे इत्यादी महत्वपूर्ण अधिकार देण्यात आले. 5. प्रांतीय विधिमंडळातील सदस्यांना प्रस्ताव प्रस्तुत करणे, प्रश्न व पूरक प्रश्न विचारणे तसेच अंदाजपत्रकावर चर्चा करणे इत्यादी अधिकार बहाल केले गेले. 6. केंद्रिय विधिमंडळातील सदस्यांनी कोणत्या विषयावर चर्चा करू नये याची आचार संहिता 1919 च्या ॲक्टने निर्धारित केले.''[43]

1919 च्या ॲक्टने भारतीयांना अंशत: जबाबदार शासन दिले. सत्तेचे विकेंद्रीकरण अंशत: केले परंतु गव्हर्नर जनरलकडेच भारत सरकारच्या शासनाची सूत्रे केंद्रित ठेवली. भारतासारख्या गरीब देशामध्ये मतदारांच्या अर्हता आर्थिक घटकावर निर्धारित केल्यामुळे मतदानाचा अधिकार अत्यल्प नागरिकांना मिळाला. "1919 च्या ॲक्टने राखीव व सोपी व असे प्रांतीय क्षेत्रातील विषयांचे विभाजन केले.''[44] त्यावरही गव्हर्नर जनरलचे प्रभुत्व ठेवले. राज्य सचिवाच्या अधिकार क्षेत्रात मर्यादा आणण्यात आली. व त्यांच्या अंतर्गत "हाय कमीशनर''[45] या पदाची नेमणूक 1919 च्य ॲक्टने करण्यात आली. या पदाकडे मुख्यत: व्यापारी कार्य, व ब्रिटिशकालीन भारताचे प्रतिनिधित्व आतंरराष्ट्रीय स्तरावर करण्याचे काम सोविण्यात आले.

1919 च्या भारत शासन अधिनियमांची अमलबंजावणी 1920 मध्ये करण्यात आली. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या घटकानुसार शासन चालवतांना कोणत्या बाबी समोर आल्या याचे अध्ययन करण्याकरिता पुढील 10 वर्षांनी आयोगाची नेमणूक करण्याचे ठरविण्यात आले. "1919 च्या अधिनियम बाबीतला भारतीयांचा असंतोष 1920 चे असहयोग आंदोलन स्वराज्य दलाची भूमिका''[46] इत्यादी कारणांमुळे जो आयोग 1919 च्या ॲक्टची शाहनिशा करण्याकरिता 10 वर्षांनी नेमण्यात येणार होता. तो नोव्हेंबर 1927 मध्ये सायमन कमिशन या नावाने नेमण्यात आला. या आयोगावर नेमण्यात आलेल्या सदस्यांमध्ये एकही भारतीय नव्हता त्यामुळे याचा कडाडून विरोध झाला. "1928 मध्ये कलकत्ताच्या कॉंग्रेस अधिवेशनात वसाहतीतील स्वराज्याची मागणी करण्यात आली होती. इंग्रजांनी या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे लाहोरमधील कॉंग्रेस अधिवेशनात 1930 मध्ये पूर्ण स्वराज्याची मागणी करण्यात आली.''[47] भारतीयांचा असंतोष दिवसेंदिवस वाढत होता त्याकडे ब्रिटिश दुर्लक्ष करून चालणार नव्हते. "1928 ची नेहरूने रिपोर्ट व तीन्ही गोलमेज परिषदेमध्ये''[48] भारतीयांनी केलेल्या मागण्या यामुळे ब्रिटिशांना भारतीयांचा असंतोषाचा परिचय झाला.

1919 ते 1935 दरम्यान भारतामध्ये ब्रिटिशांविरूध्द विविध आंदोलने झाली. 1927 ला भारतात आलेल्या सायमन आयोगाने आपले प्रतीवेदन मे 1930 ला सादर केले. त्याकडे भारतातील जनमत व इंग्लडमधील तत्कालीन मजूर सरकारने दुर्लक्ष केले. परंतु सायमन कमिशनने प्रतिवेदनात दिलेल्या सूचनांचा 1935 च्या भारत शासन अधिनियमामध्ये बहुतांशी जसाचा तसा समावेश करण्यात आला. सायमन कमिशनने प्रतिवेदनात सूचविलेल्या महत्वपूर्ण सूचना पुढीलप्रमाणे होत्या :

1. "तत्कालीन उदभवलेल्या राष्ट्रीय आकांक्षेकडे ब्रिटिश सरकारने दुर्लक्ष करावे.
2. वसाहतींचे स्वराज्य देण्याबाबतीत सध्या स्थीतीत विचार करू नये.
3. जातीय व धार्मिक आधारावर विभेदीकरण कायम ठेवावे.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 2, FEB - 2022 Publication Date: 28/02/2022

4. संसदीय आणि जबाबदार शासन देण्याची सध्या गरज नाही.
5. प्रांतीय सरकारच्या मंत्रांना जबाबदारी तत्वाच्या आधारावर कार्यभार सोपवावा.
6. केंद्रीकृत शासनाऐवजी संघीय स्वरूपाचे शासन भारतासाठी लाभदायक ठरेल.
7. मताधिकारात वाढ करावा.
8. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देणे वर्तमान स्थितीत योग्य नाही.
9. विधी मंडळाच्या संख्येत वाढ करावी.
10. प्रस्थापित केंद्रीय व्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज नाही.
11. केंद्रिय विधीमंडळातील दोन्ही सभागृहातील सदस्यांची नेमणूक प्रांतीय विधीमंडळाच्या सदस्यांद्वारा अप्रत्यक्षपणे करण्यात यावी. याकरिता संघात्मक व्यवस्थेचा स्वीकार करणे अगत्याचे आहे.
12. सांप्रदायिक तत्वावर मतदार संघाची विभागणी करणे गैर आहे तरी त्याशिवाय पर्याय नाही.''[49]

1920 ते 1933 पर्यंतच्या भारतीय राजकारणातील घटना क्रमाचा प्रभाव पडून ब्रिटिश पार्लमेंन्टद्वारे प्रवर समितीचे गठन करण्यात आले. या समीतीच्या सचिव "सॅम्युअल होर''[50] यांनी सुधारित अहवाल तयार करून ब्रिटिश पार्लमेंन्टसमोर ठेवला. तोच 1935 चा भारत शासन अधिनियम होत. या अधिनियमात "321 कलमे 10 परिशिष्टे होती. व हा अधिनियम 14 भागात विभाजित होता.''[51] या अधिनियमाप्रमाणे भारतीय राजकीय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. प्रांतीय विधिमंडळांना स्वायत्ता देण्यात आली.

1773 ते 1835 या दरम्यान ब्रिटिश शासनाची केंद्रिकृत प्रवृत्ती कायम राहिली. "1935 च्या भारत शासन अधिनियमाने 11 प्रांत 6 चीफ कमिशनर क्षेत्रातील प्रदेश व 600 देशी संस्थानांना एकत्रित करून भारतात संघवाद निर्माण करण्याची योजना होती. केंद्रीय विधिमंडळातील राज्य परिषद व प्रांतीय विधिमंडळातील विधानसभेत महिलांना काही प्रमाणात आरक्षण देण्यात आले. केंद्र व प्रांत यांच्यातील वाढ सोडवण्याकरिता व इतर मुख्य कामासाठी सर्वोच्च न्यायालयाची तरतूद करण्यात आली. 11 प्रांतापैकी मद्रास, बम्बई, बंगाल,बिहार, संयुक्त प्रांत व असम या 6 प्रांतामध्ये विधानसभा व विधानपरिषद असे अशा व्दिगृही विधीमंडळाची तरतूद करण्यात आली. प्रांतीय विधीमंडळाच्या निवडणूकीत मताधिकारांचे क्षेत्र व्यापक करण्यात आले. एकूण लोकसंख्येपैकी 14 टक्के नागरिकांना मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आला. परंतु मतदाराची अर्हता मुख्यत: आर्थिक घटकावरच कायम ठेवण्यात आली.''[52]

1935 च्या अधिनियमातील बहुतांश कलमांचा समावेश भारतीय परिस्थितीनुसार बदल करून भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला. 1935 च्या अधिनियमाचे चिकित्सकपणे अध्ययन केल्यास ब्रिटिशांनी एका हाताने अधिकार दिले. व दुस-या हाताने ते अधिकार काढून घेतले. या निष्कर्षापर्यंत पोहचता येते. यामुळे "पं. नेहरू यांनी 1935 च्या अधिनियमाला दास्यतत्वाचे आशापत्र व इंजन नसलेली मोटार ज्यात अनेक ब्रेक आहेत अशी उपमा दिली आहे.''[53]

1937 नंतर प्रांतीय विधिमंडळाच्या निवडणूका झाल्या तत्कालीन 11 प्रांतापैकी 8 प्रांतामध्ये कॉग्रेस सत्ता काबीज करण्यास यशस्वी झाले. 1939 मध्ये व्दितीय महायुध्दाचा भडका उडाला. ब्रिटिशांच्या साम्राज्य अंतर्गत असणाच्या वसाहतमध्ये स्वराज्य दर्जा प्राप्त झालेल्या राष्टांनी विधिमंडळाच्या बैठका बोलवून मुदद्यामध्ये इंग्लडंला साथ देण्याचा निर्णय घेतला. ब्रिटिशांनी भारताला देखील युदधात झोकून टाकले परंतु येथील केंद्रीय व प्रांतीय विधिमंडळाची सहमती घेण्याची गरज तत्कालीन गव्हर्नर जनरल "लॉर्ड सिनली रूगोला''[54] वाटली नाही. कॉग्रेसने याचा कडाडून विरोध केला व प्रांतीय विधिमंडळातील कॉग्रेसच्या मंत्रिमंडळांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. तत्कालीन भारतात असंतोषाची आग सर्वत्र पेटली त्यामुळे "8 ऑगष्ट 1940''[55] ला भारतीयांना त्यांची राज्यघटना लिहिण्याचा अधिकार देण्यात येईल अशी घोषणा विशिष्ट अटी लादून तत्कालीन गव्हर्नर जनरलने केली.

व्दितीय महायुध्दात ब्रिटिश व मंत्र राष्टांचा विजय झाला. परंतु ब्रिटिशांची त्यांच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या राष्टावरची पकड सैल होत गेली. आंतरराष्ट्रीय दबाव व तत्कालीन भारतीय जनमानसातील प्रचंड असंतोष यामुळे भारतीयांना पूर्ण स्वाधिनता दयावी लागेल याचा वेध ब्रिटिशांना लागला. क्रिप्स योजना व शिमला करार यांच्या अयशस्वितेमुळे सर पॅथिक लॉरेन्स "सर स्टॅकडे क्रिप्स व अल्बर्ट अलेक्झाडर''[56] यांच्या नेतृत्वाखाली सुप्रसिध्द कॅबिनेट मिशन भारतात पाठवण्यात आले. भारताकरिता राज्यघटना निर्माण करण्याची जबाबदारी भारतीयांवरच सोपविण्यात येईल. राष्टमंडळाचे सदस्यतत्व कायम ठेवणे अथवा राष्टमंडळातून बाहेर पडणे याचा निर्णय भारत घेईल. या "15 मार्च 1946 च्या तत्कालीन ब्रिटिश प्रधानमंत्री अटलीच्या घोषणेने भारताची स्वतंत्रता निश्चित झाली होती. त्या दृष्टिकोणातून पाठविलेल्या त्रिमंत्री शिष्टमंडळाने भारतातील 472 गणमांण्याचे भेट घेवून 182 बैठकाच्याद्वारे भारताची स्वतंत्रता व राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया याची मुहुर्तमेढ केली. अखेर "18 जुलै 1947"[58] ला ब्रिटिश संसदेने भारतीय स्वतंत्रता कायदा 1947 पारित करून भारताच्या पूर्ण स्वराज्याला शिक्का मोर्तब केले.

### 5. ब्रिटिशकालीन भारतीय प्रशासनाची अधिकारपद सोपान

(ब्रिटिश ताज महारानी)
↓
संसद
↓
भारत राज्य सचिव आणि त्यांची परिषद
↓
गवर्नर जनरल किंवा वाईस राय
↓
मंत्रिपरिषद
↓

| विधिमंडळ | इम्पीरियल (केंद्रिय) सचिवालय | संघात्मक न्यायालय |
|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ |
| प्रांतीय गवर्नर | अन्य लोकसेवा | उच्च न्यायालय |
| ↓ | | ↓ |
| मंत्रिपरिषद लेफटीन्ट गवर्नर | | जिल्हा न्यायालय |
| ↓ | | |
| विधानसभा चीफ कमिशनर | | |
| ↓ | | |
| जिल्हाधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी | | |

स्रोत[59]

### 6. निष्कर्ष :-

ब्रिटिशांनी भारतावर सुमारे 190 वर्षे सत्ता गाजवली प्रारंभाच्या काळी दरोडेखोरांच्या टोळीप्रमाणे भारतीयांवर अमानुष अन्याय व अत्याचार करून आर्थिक लूट केली. कंपनी सरकरच्या काळात प्रशासन करण्याच्या अनुभवहीनतेमुळे भारतीयांचा असंतोष 1857 च्या उठावाच्या रूपाने उफाळून समोर आला. रेग्युलेटिंग ॲक्ट व त्यानंतरच्या चार्टर ॲक्टद्वारे ब्रिटिश पार्लमेन्टने कंपनी सरकारची शक्ती हळूहळू खिळखिळी केली. 1858 नंतर पार्लमेंन्टने भारताच्या शासनाची सूत्रे स्वत:च्या हातात घेवून भारतीयांना टप्याटप्याने राजकीय व सामाजिक सुधारणा करीत भारतावर सत्ता गाजवली. संशोधन विषयाच्या अनुषंगाने केलेल्या संशोधनाद्वारे पुढील निष्कर्षापर्यंत पोहचता येते.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 2, FEB - 2022 Publication Date: 28/02/2022

- 1773 चा रेग्येलेटिंग ॲक्ट व 1935 चा भारत शासन अधिनियम व त्यात अंतर्भूत असलेल्या तरतूदी प्रत्यक्ष व्यवहारात ब्रिटिशांनी केलेली कृती याचे विचारमंथन केल्यास ब्रिटिशांची केंद्रिकृत पध्दतीने शासन करण्याची कला 1947 पर्यंत अस्तित्वात होती हे सिध्द होते.
- कंपनी सरकार व 1958 नंतरचे ब्रिटिश सरकार यांची प्रशासकीय व्यवस्था मुख्यत: नौकरशाहीवर आधारित होती. ब्रिटिश संख्येने फार कमी होते त्यामुळे भारतीयांवर शासन करण्याकरिता भारतीयांची मदत घेण्याशिवाय तरणोपाय नव्हता त्यामुळे पाश्चात्य धर्तीचे शिक्षण ब्रिटिशांनी भारतीयांना दिले व कारकुनाची फॅक्टरी तयार केली. शिक्षणाच्या संधी सर्वांना उपलब्ध झाल्यामुळे जनप्रबोधनांची लाट पसरून प्रशासनाच्या सोईसाठी निर्माण केलेल्या राजकीय व्यवस्थेत भारतीयांनी प्रतिनितवाची मागणी केली शासनप्रणालीचा परिचय भारतीयांना झाला. या निष्कर्षापर्यंत पोहचण्यास मदत होते.
- 1957 च्या उठावामुळे कंपनी सरकारला भारतातील सत्ता गमवावी लागली. ब्रिटिश पार्लमेन्टच्या हातात सत्तेचे हस्तांतरण झाल्यामुळे व टप्पाटप्पाने निर्माण होणा-या असंतोषाला शमविण्याकरिता ब्रिटिशांनी मृदू व बनावटी उदार धोरण स्वीकारावे लागले. या निष्कर्षापर्यंत पोहचता येते.
- ब्रिटिश शासन कलेमध्ये सुविख्यात होते. भारतात प्रस्तापित झालेली राजकीय सत्ता टिकविण्यासाठी ज्या बाबी इंग्लंडमध्ये नव्हत्या त्याचाही प्रारंभ ब्रिटिशांनी भारतात केला. उदा. नौकरशाहीतील भर्तीकरिता खुल्या स्पर्धा परीक्षा भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशाला सूत्रबद्ध पद्धतीने प्रशासित करण्यासाठी ब्रिटिशांनी भारतात पाश्चात्य धर्तीच्या राजकीय व्यवस्थेचे आराखडे रचले. त्यांच्या नकळत केलेल्या या कार्याचा भारताच्या राज्यघटनेवर व त्यातील तरतूदींवर फार मोठा प्रभाव पडला यात दुमत नाही.

**संदर्भग्रंथ :**


1. सिंघल एस.सी., 'राजनितिक सिध्दात' लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशक, पान क्र.321.
2. कित्ता पान क्र.322.
3. कटारीया सुरेद्र "भारत मे लोकप्रशासन", आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपूर, 2007, पान क्र. 02
4. कित्ता पान क्र.03.
5. कश्यप सुभाष, 'भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष', रिसर्च पब्लिकेशन्स इन शोसल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.10
6. कित्ता पान क्र.10.
7. ग्रोंवर बी.एल. 'भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास', एस.चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, दिल्ली, 1995, पान क्र. 05.
8. कश्यप सुभाष, 'भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष', रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.18
9. खत्री हरीश कुमार 'भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 19
10. कित्ता पान क्र.20.
11. कश्यप सुभाष, 'भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष', रिसर्च पब्लिकेशन्स इन सोसल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.19
12. कटारीया सुरेद्र "भारत मे लोकप्रशासन", आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपूर, 2007, पान क्र. 14.
13. ग्रोवर बी.एल. 'भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास', एस.चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, दिल्ली, 1995, पान क्र. 12.
14. कित्ता पान क्र.16.
15. कश्यप सुभाष, 'भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष', रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.22
16. खत्री हरीश कुमार 'भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 20
17. कश्यप सुभाष, 'भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष', रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.22
18. कित्ता पान क्र.23.
19. ग्रोवर बी.एल. 'भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास', एस.चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, दिल्ली, 1995, पान क्र. 22.

20. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.24
21. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रत संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि. रामनगर, दिल्ली, 1995, पान क्र. 27.
22. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.24
23. कित्ता पान क्र.25.
24. खत्री हरीश कुमार ‘भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 26
25. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 34.
26. कित्ता पान क्र.36.
27. कित्ता पान क्र.28.
28. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.42
29. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 32.
30. कटारीया सुरेद्र “भारत मे लोकप्रशासन", आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपूर, 2007, पान क्र. 16.
31. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 40.
32. कित्ता पान क्र.40.
33. कटारीया सुरेंद्र “भारत मे लोकप्रशासन", आर.बी.एस.ए. पब्लिशर्स, जयपूर, 2007, पान क्र. 16-17.
34. खत्री हरीश कुमार ‘भारतीय शासन एवं राजनीति”कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 28
35. कित्ता पान क्र.28.
36. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.50
37. कित्ता पान क्र.52.
38. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 52.
39. खत्री हरीश कुमार ‘भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 30
40. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 56-58.
41. कित्ता पान क्र.59.
42. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोसल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.72-75
43. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 70-71.
44. पाटील बी.बी. “भारतीय शासन आणि राजकारण", फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2010, पान क्र. 04
45. खत्री हरीश कुमार ‘भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 31
46. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 80-81.
47. पाटील बी.बी. ‘भारतीय शासन आणि राजकारण’ फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2010, पान क्र. 05
48. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 82-83.
49. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.117-118
50. पाटील बी.बी. "भारतीय शासन आणि राजकारण" फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2010, पान क्र. 05
51. खत्री हरीश कुमार ‘भारतीय शासन एवं राजनीति कैलास पुस्तक सदन, भोपाल, 2014, पान क्र. 34
52. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.136-144
53. ग्रोवर बी.एल. ‘भारतीय स्वतंत्रता संग्राम तथा संवैधानिक विकास’, एस.चन्द एण्ड कंपनी लि., दिल्ली, 1995, पान क्र. 98.
54. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.156

55. कित्ता पान क्र.161.
56. पाटील बी.बी. “भारतीय शासन आणि राजकारण’ फडके प्रकाश', कोल्हापूर, 2010, पान क्र. 09
57. कश्यप सुभाष, ‘भारत का संविधानिक विकास और स्वाधीनता संघर्ष’, रिसर्च पब्लिकेशन्स इन सोशल साइंसेस, दिल्ली, 1972, पान क्र.204
58. पाटील बी.बी. "भारतीय शासन आणि राजकारण" फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2010, पान क्र. 09
59. कटारीया सुरेंद्र “भारत मे लोकप्रशासन’, आर.बी.ए. पब्लिशर्स, जयपूर, 2007, पान क्र. 17